सकाळ

## करिअर घडविताना



के. रवींद्र



# कॉमन युनिव्हर्सिटी एंट्रन्स टेस्ट

केंद्रीय विद्यापीठांमध्ये विशेषत: ग्रामीण आणि इतर दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना समान व्यासपीठ आणि समान संधी उपलब्ध करून देण्याच्या हेतूने देशभरातील केंद्रीय विद्यापीठ (४६), राज्य विद्यापीठ (३४), डिम्ड युनिव्हर्सिटी (२५), खासगी विद्यापीठ (८४) विद्यापीठांतील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश मिळविण्यासाठी कॉमन युनिव्हर्सिटी एंट्रन्स टेस्ट (CUET) शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेतली जाते. यासाठी ३० मार्च २०२३ पर्यंत नोंदणी करता येईल व परीक्षा ता. २१ ते ३१ मे २०२३ दरम्यान आयोजित केली जाईल.

## कोर्सेस

अकाउंटन्सी, शेती, मानववंशशास्त्र, कला शिक्षण शिल्पकला, जीवशास्त्र, व्यवसाय अभ्यास, रसायनशास्त्र, संगणक शास्त्र, अर्थशास्त्र/व्यवसाय अर्थशास्त्र, अभियांत्रिकी ग्राफिक्स, उद्योजकता, पर्यावरण अभ्यास, सामान्य चाचणी, भूगोल, इतिहास, गृहशास्त्र, ज्ञान परंपरा, प्रॅक्टिसेस इंडिया, भाषा (IA आणि IB), कायदेशीर अभ्यास, मास मीडिया/मास कम्युनिकेशन, गणित, परफॉर्मिंग आर्ट्स, शारीरिक शिक्षण, भौतिकशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, संस्कृत, समाजशास्त्र, टीचिंग ॲप्टिट्यूड इ.

- **परीक्षेची पद्धत** : अंडरग्रॅज्युएट : २०२३ पूर्णपणे संगणक आधारित चाचणी मोडमध्ये घेतली जाईल.
- **प्रश्नपत्रिकेचा पॅटर्न** : वस्तुनिष्ठ प्रकारचे प्रश्न विचारले जातात.
- **पात्रता निकष** : भारतीय राष्ट्रीय नागरिक अर्ज करण्यास पात्र असतील.
- **पात्रता** : अंडरग्रॅज्युएटसाठी, उमेदवारांनी बारावी स्तराची परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.
- **वयोमर्यादा** : परीक्षेसाठी अर्ज करण्यासाठी कोणतीही वयोमर्यादा असणार नाही.
- **टीप** : विविध विद्यापीठांनुसार पात्रता निकष वेगवेगळे असू शकतात.
- **भाषा** : अंडरग्रॅज्युएट स्तरावरील अभ्यासक्रमासाठी १३ भाषा असतील. पंजाबी, तेलगू, आसामी, बंगाली, गुजराती, कन्नड, मराठी, मल्याळम, इंग्रजी, हिंदी, उडिया, तमीळ आणि उर्दू यापैकी विद्यार्थी कोणतीही एक भाषा निवडू शकतो.

## अभ्यासक्रम व प्रश्नांचा प्रकार

| विभाग | विषय | एकूण प्रश्न | प्रश्नांचा प्रकार | कालावधी |
|---|---|---|---|---|
| विभाग IA | १३ भिन्न भाषा (कोणतीही एक निवडू शकता) | ५० | वाचन आकलन (वेगवेगळ्या भाषांवर आधारित, तथ्यात्मक साहित्य आणि कथा, साहित्यिक योग्यता आणि शब्दसंग्रह) | ४५ मिनिटे |
| विभाग IB | २० भिन्न भाषा (विभाग IA व्यतिरिक्त कोणतीही भाषा निवडू शकता) | | | |
| विभाग II-डोमेन | २७ डोमेन विशिष्ट विषय (विद्यापीठानुसार कोणताही विषय निवडू शकता) | ४० | MCQ आधारित प्रश्नांसाठी इनपुट मजकूर (बारावी NCERT अभ्यासक्रमाच्या आधारावर असेल) | ४५ मिनिटे |
| विभाग III-सामान्य चाचण्या | प्रोग्रॅम/प्रोग्रॅमसाठी विद्यापीठांद्वारे ऑफर अंडर ग्रॅज्युएट प्रवेशासाठी सामान्य परीक्षा वापरली जाते | ६० | सामान्य ज्ञान, चालू घडामोडी, सामान्य मानसिक क्षमता, संख्यात्मक क्षमता, परिमाणवाचक तर्क (मूलभूत गणितीय संकल्पना) • सामान्य ज्ञान, चालू घडामोडी, सामान्य मानसिक क्षमता, संख्यात्मक क्षमता, इ. | ६० मिनिटे |

## परीक्षेचा अर्ज

अर्ज ऑनलाइन पद्धतीने https://cuet.samarth.ac.in या पोर्टलवर भरायचा आहे.

अर्ज भरताना, उमेदवारांनी विहित नमुन्यात पासपोर्ट आकाराचे छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यास विसरू नये.

फॉर्ममध्ये चुकीचे तपशील (असल्यास) दुरुस्तीसाठी १ ते ३ एप्रिल २०२३ या कालावधीत उमेदवारांना दुरुस्तीची सुविधा दिली जाईल.

**महत्त्वाच्या लिंक : https://cuet.samarth.ac.in**

**(लेखक विद्यार्थी मित्र www.VidyarthiMitra.orgचे संस्थापक आहेत.)**

Kolhapur, Main
15/03/2023 Page No. 10